# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या ईबीसी सवलतीबाबत

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते. शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्यासंदर्भात दरवर्षी शासनाकडून महाविद्यालयास सूचना देण्यात येतात. तथापी, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संबधित महाविद्यालयाकडून ईबीसी सवलतीसाठी अर्ज भरण्यासंदर्भात वेळेत सूचना दिली जात नसल्याने विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त झालेल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या व शिष्यवृत्ती सवलतीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलतीबाबत वेळेत सूचना देण्यात याव्यात. तसेच पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत शासनास सादर केले जातील याची दक्षता घ्यावी. जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान होणार नाही. याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )<br>
संदर्भ क्र. शै.प्रवेश/४९८४ )<br>
दिनांक : २४/१२/२०१६ )

उपकुलसचिव<br>
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.

Desktop/vidita/circulars